## <u>रे. मु. क्र. ३३/२०२० मधील नि. १५ वरील आदेश</u>
(CNR No. MHAK070014192020)

१. प्रतिवादीने प्रस्तुतचा अर्ज न्यायालयीन आयुक्त म्हणुन 'स्थानीक न्यायालयीन आयुक्ताची' नेमणुक करण्यासाठी दाखल केला आहे. अर्जामध्ये सदर अर्ज कोणत्या कलमाखाली दाखल केला आहे याचा उल्लेख नाही. परंतु अर्जातील कथने व मागणी पाहता आणि प्रतिवादीने दाखल केलेली निशाणी क्रमांक १९ वरील पुरसीस चे अवलोकन करता प्रस्तुत अर्ज दिवाणी प्रक्रीया संहिता आदेश ३९ नियम ७ प्रमाणे दाखल केल्याचे समजुन निकाली काढण्यात येत आहे.

२. प्रतिवादीचे म्हणणे असे की, त्याचे मालकीचे व ताब्यातील मौजे भरतपुर ता. बाळापुर येथील शेत गट क्रमांक १४६ असुन वादीची गट क्रमांक १३९ व १४७ ची शेती आहे. सदर दोन्ही शेत प्रतिवादीच्या शेताच्या पश्चिमेकडुन आहे. प्रतिवादीच्या शेताच्या उत्तरेकडुन वादीच्या पत्नीचे शेत आहे. वादीचे गट नंबर १३९ च्या पश्चिमेकडुन उत्तर दक्षिण असा माझोड ते तांदळी असा डांबरी रोड आहे. प्रतिवादीला त्याच्या शेतात बैलगाडी ने-आण करण्यासाठी वादीच्या शेतामधुन बैलगाडी रस्ता आहे. प्रतिवादीने जबाबासोबत जोडलेल्या कच्च्या नकाशामध्ये सदर रस्ता दर्शविलेला आहे. प्रतिवादी गेल्या २० वर्षापेक्षा जास्त कालावधी पासुन सदर रस्त्याचा निर्विघ्नपणे वापर करीत आहे. त्यामुळे प्रतिवादीला वहीवाटीचा हक्क प्राप्त झाला. प्रतिवादीला दुसरा पर्यायी रस्ता नाही. असे असतांना वादीने दिनांक ०३.१२.२०२० रोजी प्रतिवादीचा सदर रस्ता काटया टाकुन अडविला. वादीने दाव्यामध्ये प्रतिवादीला अन्य रस्ता असल्याचे म्हटले असुन सदर रस्ता नकाशामध्ये दर्शविला आहे परंतु तसा रस्ता नाही.

३. सबब दोन्ही पक्षांनी समोर आणलेली परीस्थीती पाहता वस्तुस्थीती न्यायालयासमोर येणे आवश्यक आहे. वादग्रस्त बाबीवर अधिक प्रकाश पाडण्यासाठी सदर रस्त्याच्या पाहणीकरीता न्यायालयीन आयुक्त नेमणे आवश्यक आहे. प्रतिवादीने तात्पुरता मनाई हुकुमाचा आदेश होण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. सबब, तात्पुरत्या मनाई हुकुमाचा अर्ज निकाली काढण्याकरीता व योग्य निष्कर्षाप्रत येण्याकरीता अर्ज मंजुर करणे आवश्यक आहे. नियुक्ती केल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब प्रस्तुत

अर्ज.

४. वादीने सदर अर्जावर निशाणी १७ वर म्हणणे दाखल करुन त्याला विरोध केला व फेटाळण्याची विनंती केली. त्याने प्रतिवादी म्हणत असलेला रस्ता नाकारला. तसेच त्याच्या वाद कथनाप्रमाणे म्हणणे दाखल केले. त्याने दाव्यासोबत माझोड व भरतपुर येथील जंगल नकाशाची प्रत लावली असुन त्याप्रमाणे त्याने वाद कथनामध्ये म्हटल्याप्रमाणे प्रतिवादीला रस्ता असल्याचे कथन केले. सदर नकाशामध्ये प्रतिवादीने सांगितल्याप्रमाणे रस्ता नसल्याचे कथन केले. शेत रस्त्याकरीता शासकिय नकाशात दाखविलेला रस्ता पुरावा म्हणुन वापरण्यात येतो. त्यामुळे प्रतिवादीला नकाशात लाल अक्षराने स्वत: रस्ता दाखविण्याचे कोणतेही अधिकार नाहीत. म्हणुन त्याने दाखल केलेला कच्चा नकाशा पुरावा म्हणुन वापरता येत नाही तसेच जंगल नकाशाप्रमाणे रस्ता दाखविलेला असल्याने आयुक्त नेमण्याची आवश्यकता नाही. पुरावा गोळा करण्याकरीता नियुक्ती करता येत नाही. कोर्ट कमिशनर हा फक्त हद्दीबाबत वाद असल्यास व कोणताही शासकिय पुरावा उपलब्ध नसल्यास नियुक्त करता येतो. त्यामुळे ज्याअर्थी जंगल नकाशामध्ये रस्ता दाखविलेला आहे त्याअर्थी प्रस्तुत अर्ज मंजुर करता येणार नाही. प्रतिवादीने प्रस्तुत अर्ज वादीला त्रास देण्याकरीता, गुंतागुंत निर्माण करण्याकरीता व प्रकरण लांबविण्याकरीता दाखल केला आहे. सबब, अर्ज रक्कम रूपये ५,०००/- खर्च बसुन नामंजुर करण्यात यावा.

५. अर्ज व म्हणणे वाचले. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुत अर्ज दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश ३९, नियम ७ प्रमाणे दाखल केल्याचे दिसते. सदर नियमाप्रमाणे अंतरीम मनाईहुकूमाच्या अर्जाच्या सुनावणीवेळी न्यायालय दावामिळकतीच्या पाहणीबाबत योग्य तो आदेश करु शकते. प्रस्तुत दाव्यात सध्या दोन्ही पक्षांच्या अंतरीम मनाईहुकूमाचे अर्ज सुनावणीसाठी प्रलंबित आहे. प्रस्तुत अर्जाद्वारे प्रतिवादी यांनी दावामिळकतीकडे जाणा-या वहिवाटीच्या रस्त्याच्या पाहणीकरीता न्यायालयीन आयुक्ताची नियुक्ती करण्याची विनंती केली आहे. अशा परिस्थितीत प्रस्तुत अर्ज हा सदर नियमाप्रमाणे चालविण्यायोग्य दिसून येतो.

६. वादीने निशाणी ५ अर्जाद्वारे विनंती केली आहे की, प्रतिवादी यांना दावामिळकतीमधून जाण्यास मनाई करण्यात यावी. प्रतिवादीने निशाणी १२ अर्जाद्वारे

विनंती केली आहे की, वादींनी प्रतिवादी म्हणत असलेल्या वहिवाटीच्या रस्त्याने जाण्या-येण्यास व बैलगाडी नेण्यास कोणताही प्रकारचा अडथळा करु नये, असा मनाईहुकूम देण्यात यावा. वादी आणि प्रतिवादी हे त्यांच्या म्हणण्या पुष्ठ्यर्थ जंगल नकाशावर विसंबुन आहेत. वादीने दाखल केलेला जंगल नकाशा बारकाईने पाहता त्यानुसार ते म्हणत असल्याप्रमाणे प्रथमदर्शनी रस्ता दिसून येत आहे. परंतु सदर जंगल नकाशाची पुर्ण प्रत प्रतिवादीने दाखल केली असून त्याप्रमाणे वादी म्हणत असलेला रस्ता हा त्यातील सूचीप्रमाणे बैलगाडी रस्त्याएवढा रुंद दिसून येत नाही. त्यामुळे वादी म्हणत असल्याप्रमाणे जरी प्रथम दर्शनी रस्ता दिसत असला तरी तो बैलगाडी रस्ता असल्याचे वाटत नाही. त्याचप्रमाणे प्रतिवादीने दाखल केलेल्या जंगल नकाशामध्ये त्यांनी सुध्दा हा खुण करुन ते म्हणत असलेला रस्ता दर्शविला आहे. त्यामुळे त्यावरुनही ते म्हणत असलेला रस्ता अस्तीत्वात आहे किंवा कसे याबाबत शासकिय अभिलेखाचा पुरावा समोर नाही. प्रस्तुत दावा हा कायम मनाईहुकूम, जाहीरनामा आणि करणात्मक आदेशासाठी दाखल आहे. त्यामध्ये प्रतिवादी यांना वादीच्या दावामिळकतीमधून जाण्यापासून मनाई आणि अन्य रस्ता वहिवाटीचा असल्याचे घोषित करुन त्या रस्त्याचा वापर करण्याचा बंधनकारक आदेश मागितला आहे. एकुणच वादाचे स्वरुप, दोन्ही पक्षांचे अंतरीम मनाईहुकूमाचे अर्ज, दोन्ही पक्षांची परस्पर विरोधी कथने, रस्त्याबाबत स्पष्टता दर्शविणा-या शासकिय अभिलेखाचा अभाव आणि दोन्ही पक्षांचे अंतरीम मनाईहुकूमाचे अर्ज निर्णित करण्यासाठी आवश्यक असणा-या परिस्थितीचा अभाव यावरुन जागेवरील परिस्थिती न्यायालयासमोर येण्यासाठी पाहणी करण्याकरीता न्यायालयीन आयुक्ताची नेमणुक आवश्यक वाटते. त्याचप्रमाणे प्रस्तुत अर्ज मंजुर करतांना वादी म्हणत असलेली स्थितीबाबतचे तथ्य सुध्दा समोर येणे आवश्यक आहे. जरी त्याबाबत पाहणीसाठी प्रतिवादीची प्रार्थना नसली तरी असा आदेश न्यायाच्या हितास्तव पारीत करणे उचित होईल. सबब, प्रस्तुत अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. प्रतिवादीचे वकिल हजर आहे परंतु वादी व त्यांचे वकिल गैरहजर आहेत. सबब, वकील श्री डी. टी. जंजाळ यांची नियुक्ती आयुक्त म्हणुन करणे उचित होईल. म्हणून मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. प्रतिवादीचा अर्ज खालीलप्रमाणे मंजुर करण्यात येत आहे.

२.     न्यायालयीन आयुक्त म्हणुन वकील श्री डी. टी. जंजाळ यांची नेमणुक करण्यात येत आहे.

३.     न्यायालयीन आयुक्त यांनी मौजे भरतपुर, ता. बाळापुर, जि. अकोला येथे गट क्र. १३९, १४०, १४१, १४३, १४६ व १४७ आणि मौजे माझोड, ता. बाळापुर, जि. अकोला येथे गट क्र. ५३६ या मालमत्तांमध्ये आणि आवश्यकता भासल्यास त्यांच्या आजुबाजुच्या मालमत्तांमध्ये प्रवेश करून पाहणी करावी. दोन्ही पक्षांच्या वाद कथनांचे अवलोकन करावे. तसेच आपला अहवाल खालील मुद्दयांवर स्पष्टपणे सादर करावा.

**अ.** प्रतिवादीने कैफियतीत म्हटल्याप्रमाणे प्रतिवादीला त्याच्या मिळकत गट क्र. १४६ मध्ये बैलगाडी ने-आण करण्यासाठी वहिवाटीचा रस्ता आहे काय. असल्यास त्या रस्त्याचे स्वरुप आणि स्थान,

**ब.** वादीने दाव्यात म्हटल्याप्रमाणे प्रतिवादीला त्याच्या मिळकत गट क्र. १४६ मध्ये बैलगाडी ने-आण करण्यासाठी वहिवाटीचा रस्ता आहे काय. असल्यास त्या रस्त्याचे स्वरुप आणि स्थान,

**क.** प्रतिवादीला त्याच्या मिळकत गट क्र. १४६ मध्ये बैलगाडी ने-आण करण्यासाठी किती रस्ते आहेत. असल्यास त्या सर्व रस्त्यांचे स्वरुप आणि स्थान,

४.     प्रतिवादीने न्यायालयीन आयुक्ताचे तपासणी शुल्क रक्कम रुपये ३०००/- हे न्यायालयात जमा करावे व कागदपत्रांची पुर्तता करावी.

५.     येणेप्रमाणे प्राधिलेख काढण्यात यावे.

६.     न्यायालयीन आयुक्त यांनी दोन्ही पक्षांना पुर्व नोटिस काढून दोन्ही पक्षांच्या हजेरीत पाहणी करुन अहवालासह नकाशा विस दिवसांच्या आत न्यायालयात सादर करावा.

बाळापुर.                                        (चं. प्र. रघुवंशी)
दिनांक ०९.०४.२०२१.                    दिवाणी न्यायाधीश, क. स्तर बाळापुर.

Certificate

I affirm that the contents of this P.D.F. file are same word for word as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | : | Shaikh Rafique |
| Court Name | : | C.J.J.D. & J.M.F.C., Balapur. |
| Date | : | 09/04/2021. |
| Signed by Presiding Officer on | : | 09/04/2021. |
| Uploaded on | : | 09/04/2021. |

..........................................................................................................................
.